॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.३० (प्रतिनिधी ) सिनॅरिझीया लाईफ सायन्सेस, वाडा, मुंबई या नामांकित कंपनीसाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रसायन तंत्रज्ञान संस्थेतील तीन विद्यार्थ्यांची निवड झाली.

सिनॅरिझीया लाईफ सायन्सेस, वाडा, मुंबईच्या कंपनीत विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षामार्फत घेण्यात आलेल्या मुलाखती मध्ये विद्यापीठाच्या रसायन तंत्रज्ञान संस्थेतील केमिकल इंजि. च्या कुष्णा टाके, तेजस पाटील व प्रणव महाजन या तीन विद्यार्थ्यांची ज्युनिअर एक्झुक्युटीव्ह प्रोडक्शन या पदाकरीता निवड झाली आहे. रू. ४.६० लाख या वार्षिक वेतनावर या विद्यार्थ्यांची निवड झाली. कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, प्रशाळेचे संचालक प्रा.अजय गोस्वामी, केमिकल इंजिनिअरींगचे विभागप्रमुख प्रा. जे.बी. नाईक, डॉ. उज्ज्वल पाटील, प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

**बातमी क्र. २**

जळगाव दि.३० (प्रतिनिधी ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा रा.से.यो. विभाग आणि विद्या विकास मंडळाचे सी.गो. पाटील महाविद्यालय, साक्री यांच्या संयुक्त विद्यमाने उद्या शनिवार दि. ३१ ऑगस्ट रोजी ऑनलाईन होणाऱ्या साने गुरूजी व्याख्यानमाले अंतर्गत प्राचार्य डॉ. पी.डी. देवरे यांचे व्याख्यान होणार आहे.

साने गुरूजी कथामाला, मुंबई यांनी विद्यापीठाला दिलेल्या देणगीतून या व्याख्यानमालेचे आयोजन केले जाते. **'राष्ट्र निर्माणात शिक्षणाचे महत्व'** या विषयावर डॉ.पी.डी. देवरे हे ऑनलाईन संवाद साधणार असून व्य.प. सदस्य राजेंद्र नन्नवरे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहतील. रा.से.यो. चे संचालक डॉ. सचिन नांद्रे व सी.गो. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे हे प्रमुख संयोजक आहेत. सकाळी ११ वाजता झूम आणि यू ट्यूब द्वारे या व्याख्यानाचे प्रसारण केले जाणार आहे.

..........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ३० ऑगस्ट, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी